तात्काळ कार्यमुक्त (Stand Relieve)
नियतकालीक बदल्या २०२४

ITC Cell, E-3149112
M. H. & A. D. Authority
Inward No.: 3984
Date: 18-10-24

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१**
**जा.क्र.प्राधि/बदली/वर्ग-१,२/२०२४/प्र.७/ 2371 /२०२४**
**दिनांक :- 17 OCT 2024**

**संदर्भ:** १) प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/बदली/२०२४/प्र.७/१९२०/२०२४, दि.२१/८/२०२४
२) प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/बदली/२०२४/प्र.७/१९२१/२०२४, दि.२१/८/२०२४
३) प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/बदली/२०२४/प्र.७/१९२२/२०२४, दि.२१/८/२०२४
४) प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/बदली/२०२४/प्र.७/१९२३/२०२४, दि.२१/८/२०२४
५) प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/बदली/२०२४/प्र.७/१९२४/२०२४, दि.२१/८/२०२४
६) प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/बदली/२०२४/प्र.७/१९२५/२०२४, दि.२१/८/२०२४
७) प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/बदली/२०२४/प्र.७/१९२६/२०२४, दि.२१/८/२०२४

**आ दे श**

प्राधिकरणाचे उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ७ वरील आदेशान्वये प्राधिकरण विभाग व प्रादेशिक मंडळांच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य), सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ, लेखाधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी, मिळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी, शाखा अभियंता/स्थापत्य आणि विभागीय लेखापाल संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, अद्याप काही अधिकारी/कर्मचाऱ्यांना विभागप्रमुखांनी कार्यमुक्त केले नाही. विभागप्रमुखांनी कार्यमुक्त केल्यानंतर अधिकारी/कर्मचारी बदलीच्या ठिकाणी रुजू झालेले नाहीत. ही बाब अत्यंत अनुचित असून, प्रशासकीय शिस्तीचा भंग करणारी आहे.

२/- यास्तव, सर्व विभागप्रमुख/कार्यालयप्रमुखांना खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

अ) प्राधिकरणाचे बदली संदर्भातील आदेशान्वये बदली झालेल्या, तथापि विभागप्रमुखांनी कार्यमुक्त न केलेल्या आणि कार्यमुक्त केल्यानंतर बदलीच्या ठिकाणी रुजू न झालेल्या कर्मचारी/अधिकारी यांना प्राधिकरण स्तरावरुन तात्काळ कार्यमुक्त (Stand Relieve) करण्यात येत आहे.

ब) बदली आदेशातील कर्मचारी/अधिकारी यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी विभागप्रमुख/कार्यालयप्रमुखांनी त्वरित कार्यमुक्त करावे. बदली आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांना त्वरित कार्यमुक्त न केल्यास त्यांचे वेतन व भत्ते मूळ खात्याच्या आस्थापनेवर काढता येणार नाहीत. बदली आदेशातील अशा अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन त्यांच्या मूळ आस्थापनेवर काढल्यास संबंधित विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येऊन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

क) विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांनी कार्यमुक्त केल्यानंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी बदलीच्या ठिकाणी रुजू न होता कोणत्याही कारणास्तव रजेवर गेला असल्यास, अशा अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते मूळ खात्याच्या आस्थापनेवर काढू नयेत आणि सदर कर्मचाऱ्यांची वेतनाबाबतची माहिती, अधिकारी/कर्मचारी यांस कार्यमुक्त केल्याच्या टिप्पणीसह बदली झालेल्या विभागास कळवावी. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांस रजेवरुन परतल्यानंतर मूळ ठिकाणी हजर करुन घेऊ नये.

ड) विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांनी बदली आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त न केल्यास संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याने परस्पर बदली झालेल्या ठिकाणी हजर व्हावे.

इ) या आदेशाच्या अनुषंगाने विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांनी कार्यमुक्त केल्याचा व संबंधित अधिकारी/कर्मचारी रुजू झाल्याचा अनुपालन अहवाल विनाविलंब सचिव/प्राधिकरण कार्यालयास सादर करावयाचा आहे.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा.उपाध्यक्ष /प्रा यांच्या मान्यतेने**

**(नीलिमा धायगुडे)**
**सचिव/प्राधिकरण**

**<u>प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना:</u>**

१) मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु.मंडळ
३) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
४) वित्त नियंत्रक/प्रा.
५) विधी सल्लागार/प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
८) मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मं., कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ
९) चौकशी अधिकारी/प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी -१,२ /प्रा.
११) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१२) सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मंडळ
१३) उपमुख्य अभियंता, द.व गु. नि. कक्ष, जेएन-एन.यु.आर.एम.कक्ष, विशेष नियोजन प्राधिकरण/प्रा.
१४) उपमुख्य अभियंता, प्र.नि.स., पुर्व, पश्चिम, बी डी डी/ मुंबई मंडळ/मुं झो सु मंडळ
१५) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष/प्रा. (संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)
१६) उपमुख्य अभियंता, परिमंडळ -१, २, ३, ४/मुं.इ.दु.व पु.मंडळ
१७) वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई मंडळ
१८) कार्यकारी अभियंता, १ ,२, ३, विद्युत/प्रा.
१९) कार्यकारी अभियंता, नि.का.अ., मुलुंड,गोरेगाव,वांद्रे, बोरीवली, कुर्ला, शहर, प्र.नि.स, बी.डी.डी., विद्युत /मुंबई मंडळ
२०) कार्यकारी अभियंता, नि.का.अ., ए,बी-१,बी-२,सी-१,सी-२,सी-३,डी-१,डी-२,डी-३,ई-१,ई-२, फ (दक्षिण), ग (दक्षिण), फ (उत्तर), ग (उत्तर)/ मुं.इ.दु.व पु.मंडळ
२१) कार्यकारी अभियंता, पूर्व, पश्चिम, शहर /मुं.झो.सु.मंडळ
२२) उपमुख्य अधिकारी, पणन /मुंबई मंडळ.
२३) मुख्य लेखाधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.पु.मंडळ
२४) लेखा अधिकारी, प्राधिकरण, मुंबई मंडळ, मुं इ दु व पु मंडळ, मुं.झो.सु.मं.,कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ
२५) उपनिबंधक, सहकारी संस्था/मुंबई मंडळ
२६) उपमुख्य अधिकारी, प्रशासन, मिळकत व्यवस्थापक, धारावी पुनर्वसन प्रकल्प/मुंबई मंडळ
२७) उपमुख्य अधिकारी, पुनर्रचित गाळे, संक्रमण शिबीर गाळे/मुं.इ. दु.व पु.मंडळ
२८) मिळकत व्यवस्थापक, धारावी(सायन), वांद्रे (पूर्व/पश्चिम), पणन, गोरेगाव, बोरीवली, कुर्ला, घाटकोपर, जा.बँ.प्र., सायन, मुलुंड, मालाड, चेंबूर/ मुंबई मंडळ

२९) मिळकत व्यवस्थापक, पुनर्रचित गाळे, संक्रमण शिबीर गाळे/मुं.इ. दु.व पु.मंडळ
३०) सहाय्यक लेखाधिकारी -परि- १, २, ३, ४ /मुं.इ.दु.व पु.मंडळ
३१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
३२) संचालक, पी.डी.सी. पुणे

प्रत: प्रशासकीय अधिकारी, प्राधि./मुं.इ.दु.व पु.मं./मुं.झो.सु.मं./कोंकण/पुणे/नाशिक /नागपूर/औरंगाबाद अमरावती मंडळ

प्रत: कार्यासन अधिकारी, वित्त/प्रा., प्रशासन/मुंबई मंडळ

<u>प्रत माहितीसाठी :-</u>
मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक

118